**सं.फौ.के.नं. ३२६/२०२३**

**नि. क्र. १० लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांचा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – विजय यशवंत शिंदे,

**वय** – ५१ वर्षे, **व्यवसाय** – पोलीस पाटील, कोंडये गाव.

**रा.** कोंडये, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>साक्षीदाराचा सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेकडून शपथेवर सुरु</u> –**

०१. सन २०२३ साली मी कोंडये गावचा पोलीस पाटील होतो आणि फुणगुस गावचा अतिरिक्त पदभार सांभाळत होतो. दि. १४/११/२०२३ रोजी मी घरी होतो. त्या वेळी मला संध्याकाळी मुटगर यांचा फोन आला की, फुणगुस रिक्षा स्टॉप जवळ या, आपल्याला छाप्याकामी जायचे आहे. मी रिक्षा स्टॉप जवळ आलो. त्यांना विचारले की, कुठे जायचे आहे. त्यांनी मला सांगीतले की, त्यांना विश्वसनीय बातमी मिळाली आहे की, चंद्रकांत महाजन नामक व्यक्ती गावठी हातभट्टीच्या दारुचा व्यवसाय करतो.

०२. माहीती मिळाल्यानुसार मी, फुणगुसचे नवीन पोलीस पाटील प्रशांत थुल, पोलीस मुटगर, पोलीस मस्कर, गजानन भोसले, मारुती गुरव असे चंद्रकांत महाजन यांच्या घराजवळ गेलो. फुणगुस कडेवठार ते कुमजाई जाणा–या रस्त्याच्या डाव्या बाजूला झाडीझुडपात वॉच करत असताना दोन पांढ–या फिक्कट रंगाचे कॅन आणि दारु एक वासाचा ग्लास असा मुद्देमाल आरोपी त्याच्या समक्ष घेऊन बसलेला आढळून आला. पोलीसांनी ते दोन कॅन आणि ग्लास आमच्या समक्ष जप्त केले. पोलीसांनी या घटनेविषयी माझ्याकडे चौकशी केली होती. त्या कॅनमध्ये गावठी हातभट्टीच्या दारु आढळून आली होती.

०३. पोलीसांनी दुस–या दिवशी आमचे टिपण नोंदवले होते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. मी त्याला ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेतर्फे</u> –**

०४. हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी मी दारुच्या अनेक केसेसमध्ये साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावचा पोलीस पाटील असल्याने माझे नाव साक्षीदार म्हणून घेतले जायचे. मी पोलीसांना माझ्याकडे फुणगुस गावचा अतिरिक्त पदभार असल्याबाबत कागदोपत्री पुरावा दिला नाही. मला तथाकथीत ज्या नंबरवरुन फोन आला तो नंबर सांगता येणार नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस पाटील असल्याने मला माझ्या नोंदवहीमध्ये रोजच्या कामकाजाची नोंद करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, फुणगुस भोसलेवाडी येथे अनेक राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फुणगुस कडेवठार ते कुमजाई या रस्त्यावर वाहनांची वर्दळ सुरु असते.

०६. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आम्हाला छाप्याकामी बोलावले असते प्रोव्ही वॉच करत असताना आरोपी त्याच्या पुढ्यात गावठी हातभट्टीच्या दारुने भरलेला प्लॅस्टीकचा कॅन घेऊन बसलेला दिसला हे मी खोटे नमुद करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दोन पांढ–या रंगाचे प्लॅस्टीकचे कॅन आणि दारु वासाचा ग्लास मिळून आला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी व्यक्तीशः माझ्याकडे या घटनेविषयी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.01.28 18:18:43 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**

**दिनांक – २८/०१/२०२५**